


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ७०१ . वा | गुरूवार | दि. ०७ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# कायद्यापासून किती काळ पळत राहणार पळपुटे कोठाळे?

## चौकशी सुरू झाली,कारवाईही लवकरच होणार...

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे गेल्या अनेक वर्षांपासून एकीकडे अनिर्बंध भ्रष्टाचार करतात, तर दुसरीकडे स्वतःचा भ्रष्टाचार दाबण्यासाठी नाना क्लृप्त्या करतात. गेल्या काही महिन्यांपासून ते चौकशी समितीला रेकॉर्ड देण्यास टाळाटाळ करीत आहेत. परंतु कायद्यापासून किती काळ अविनाश अंबादास कोठाळे आपण पळत राहणार, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. शेवटी एक ना एक दिवस कायद्याचा दंडुका हा बसल्याशिवाय राहणार नाही. त्यातून अविनाश अंबादास कोठाळे व त्यांचे भ्रष्टाचारी संचालक देखील सुटणार नाही. जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावती या संस्थेत अगदी स्थापनेपासूनच बनावटगिरी, गैरप्रकार आणि भ्रष्टाचार अविनाश कोठाळे व त्यांचे काही चेलेचपाटे करीत आहेत. आपल्याच अधिकाऱ्यांची दिशाभूल, सहकार विभाग व उपनिबंधक कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना खोटी माहिती देणे असे प्रकार करीत कोठाळे यांनी बँकेची स्थापना केली. जिजाऊ बँक ही खरे तर बहुजन समाजाच्या उत्थानासाठी झाली होती. त्या दृष्टीनेच या बँकेच्या स्थापनेला मराठा समाजाच्या उत्थानासाठी लढणाऱ्या मराठा सेवा संघानेही बँकेला सहकार्य केले होते. मात्र, कोठाळे हे नंतर बँकेच्या स्थापनेचा उद्देश विसरले व बहुजन समाजाच्या विकासाऐवजी स्व-विकासासाठी बँकेचा वाट्टेल तसा वापर करू लागले.

**जिजाऊ कमर्शियल अमरावती बँकेचा प्रताप भाग-२०६**

अविनाश अंबादास कोठाळे व त्यांच्या काही नालायक संचालकांनी गेल्या दोन दशकांच्या कार्यकाळात बँकेत अनिर्बंध भ्रष्टाचार केले, नाना गैरप्रकार केले, नियम व कायदे पायदळी तुडवले. प्रसंगी रिझर्व्ह बँक व सहकार खात्याला ठेंगा दाखवत मनमानी कारभार केला. परवानगी नसतानाही एटीएम सुरू करणे, मर्जीतील कर्जदारांना बेकायदेशीर कर्जवाटप करणे, नंतर या कर्जदारांचे कर्ज व व्याज बेकायदेशीरपणे माफ करणे, मर्जीत नसलेल्या कर्मचारी व कर्जदारांना नाना प्रकारे त्रास देणे, कर्जदारांनी बँकेत पैसे भरणा केल्यानंतर परस्पर ते पैसे दुसऱ्याच खात्यात वर्ग करणे, या माध्यमातून पैशांची अफरातफर करणे, मर्जीत नसलेल्या कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देणे, मर्जीतील लोकांचा बँकेत कर्मचारी म्हणून बेकायदेशीर भरणा करणे, मर्जीत नसलेल्या कर्जदारांच्या घरांवर दिवसाढवळ्या दरोडा टाकणे, त्यांच्या घरातील किमती वस्तू व सामग्रीची चोरी करणे, असे एक ना अनेक प्रकार कोठाळे व त्यांच्या नालायक संचालकांनी व अधिकाऱ्यांनी केले. हे सर्व काही करीत असताना उपनिबंधक विभाग व सहकार खात्याने कोठाळेंच्या भ्रष्टाचाराकडे अर्थपूर्ण डोळेझाक केली. त्यासाठीही कोठाळेनि फिल्डिंग लावली असण्याची शक्यता आहे. कारण एव्हढा अनिर्बंध भ्रष्टाचार सुरू असताना कोणाही अधिकाऱ्याच्या लक्षात ही बाब आली कशी नाही. नियम मोडणे, गैरप्रकार करणे, भ्रष्टाचार करणे व त्यातून प्रचंड पैसा अवैध मार्गाने कमावणे हे जणुकाही कोठाळे यांच्या रक्तातच भिनले आहे. शिवाय आपण केलेली पापे झाकण्यासाठी नंतर वाट्टेल त्या थराला जाणे हाही कित्ता कोठाळे यांनी प्रत्येक वेळी गिरवण्याचा प्रकार केला. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे या सर्व गैरव्यवहारांचे पुरावे आल्यानंतर या वृत्तपत्राने या गैरप्रकारावर प्रकाश टाकण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून कोठाळेंचे गैरप्रकार जनतेसमोर आणण्याचे काम केले. एव्हढेच नाही, तर सहकार खात्यापासून ते उपनिबंधक कार्यालयापर्यंत सर्वच अधिकाऱ्यांच्या खुर्च्या हालवण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने पार पाडले. त्यानंतर काही प्रमाणात शासन-प्रशासनाला जाग आली. विधिमंडळापर्यंत विषय पोहोचल्यानंतर मग प्रशासन खडबडून जागे झाले व चौकशा सुरू झाल्या. या चौकशाही रेंगाळवण्याचे काम कोठाळे यांनी केलेले आहे. सद्यःस्थितीत बँकेची कलम ८३ अंतर्गत चौकशी सुरू आहे. मात्र, ही चौकशी लांबवण्यासाठी कोठाळे अत्यंत निर्लज्जपणे वाट्टेल त्या थराला जाऊन प्रयत्न करीत आहेत. कारण कोठाळे यांना कसलीही लाज-शरम नाही. भ्रष्टाचाराने त्यांची मती पूर्णपणे गुंग करून टाकली आहे. आता स्वतः ची कातडी वाचवण्यासाठी ते वाट्टेल त्या थराला




जात आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून चौकशी समिती कोठाळे यांना रेकॉर्डची मागणी करीत आहे. परंतु कोठाळे हे रेकॉर्ड देण्यास टाळाटाळ करीत आहेत. शेवटी सहकार आयुक्तांनी या प्रकरणी पोलिस तपासात रेकॉर्ड ताब्यात घेण्याचे निर्देश दिले. त्यामुळे आता कोठाळे यांनी स्वतः ची कितीही कातडी वाचवण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांना ते जमणार नाही. कायद्याचा दंडुका हा कोठाळे व त्यांच्या काही नालायक संचालक-अधिकाऱ्यांना बसणारच आहे. येथवर ही स्थिती आणायला सर्वांत मोठा सिंहाचा वाटा आहे तो सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचा. दैनिक जनसंचलन भ्रष्टाचाऱ्यांना उघडे पाडून त्यांना गजाआड करण्यासाठी सातत्याने लढा देत राहणार आहे. त्या लढ्याला उशिरा का होईना परंतु आता यश यायला लागले आहे, तर यामुळे कोठाळे यांच्यासारख्या भ्रष्टाचाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे. बघुया भविष्यात काय होते ते.

**अजून बरेच काही पुढील प्रत्येक सत्रात**

# चाकूने हल्ला करून ४ जणांना जखमी करणाऱ्यास मिळाली जन्मठेपाची शिक्षा...

## २०१६ मध्ये बुलडाण्यात गरबा उत्सवात सागर टेंभीकरने केला होता हल्ला

**जनसंचलन /बुलढाणा**

बीसीसीएन-बुलढाणा अर्बनकडून गरबा महोत्सव आयोजित केला जा-तो. येथील जिजामाता स्टेडियममध्ये गरबा सुरु असताना एका माथेफिरू युवकाने चाकूहल्ला करून चार युवकांना घायाळ केले होते. घटनेत जखमी झालेल्या ५ ही जणांना हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले होते. या प्रकरणी ६ मार्च २०२४ रोजी हल्लेखोर ३४ वर्षीय सागर उर्फ गोलू टेंभीकर याला विशेष न्यायाधीश श्री आर. एन. मेहरे यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. यादरम्यान ७ ऑक्टोबर २०१६ रोजी सायंकाळी ८ वाजेच्या सुमारास आरोपी सागर सारंगधर टेंभीकर खुर्चीवर उभा राहून नाचत होता व इतर लोक त्याला खाली उतर असे म्हणत होते. तेव्हा सुमित राजभोज व त्याचा भाऊ अमित, जुनागांव बुलढाणा येथील सोनु सुभाष सोळंके आणि इक्बाल नगर मधील शे. मोहसीनशेख हबीब हे चारही जण सागरला खाली उतरून नाच, असे समजावून सांगत असतांना त्याने रागाने त्याच्या खिशातील चाकू काढून चारही जखमींना जीवे मारण्याच्या उद्देशाने चाकूने सपासप वार केले. त्यामध्ये सुमित राजभोज, अमित राजभोज, सोनु सोळंके, शेख मोहसीन हे जखमी झाले. त्यानंतर अमित राजभोज व सुमित राजभोज दोघांवर जिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार झाल्यानंतर त्यांना पुढे छ. संभाजीनगर येथील खाजगी हॉस्पीटल येथे उपचार घेतले पोलीसांनी फिर्यादी सुमीत राजमोज याचे जबाबावरून आरोपी सागर टेंभीकर विरोधात पो. स्टे. बुलढाणा येथे कलम ३०७, ३२६, ३२४, भादंवि नुसार गुन्हे दाखल केला होता. सरकार पक्षाने एकुण ९ साक्षीदाराचे पुरावे नोंदविले, त्यामध्ये अमित राजभोज सुमित राजमोज तसेच शेख मोहसीन प्रत्यक्षदर्शी एक साक्षीदार, तसेच बुलढाणा व छ. संभाजीनगर येथील दोन डॉक्टर यांची साथ महत्वाची ठरली. त्यामुळे न्यायालयाने कलम ३०७ व ३२६, ३२४, भा. दं. वि. चे अंतर्गत विद्यमान आरोपीस दोषी ठरवून जन्मठेप शिक्षा सुनावली. सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी वकील एस. पी. हिवाळे यांनी अतिशय प्रभावीपणे युक्तीवाद करून सरकारी पक्षाची बाजू वि. न्यायालयासमोर मांडली सरकारी पक्षाच्या वतीने सहा. सरकारी वकील ॲड. एस. पी. हिवाळे यांन काम पाहिले.

# चिखली तालुक्यात लाईनमन दिवस मोठ्या उत्साहात साजरा,रक्तदान शिबीर हि झाले संपन्न

जनसंचलन / चिखली



सोमवार दि. ०४ -मार्च २०२४ रोजी उपविभाग चिखली येथे लाईनमन दिवस साजरा करण्यात आला. गेल्या वर्षी पासून जागतिक लाईनमन दिवसाची सुरवात झाली. त्यानिमित्ताने विज क्षेत्रात कार्यरत असलेले सर्व लाईन मन यांचा या दिवशी सत्कार करण्यात आला. उपविभाग चिखली येथे लाईनमन दिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सकाळी ९.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये जवळपास ४० कर्मचाऱ्यांनी रक्तदान दिले. विशेष म्हणजे चिखली चे कर्तव्यदक्ष तहसीलदार श्री संतोष काकडे यांनी सुद्धा या ठिकाणी शुभेच्या रुपी भेट देऊन स्वतः रक्तदान दिले. तहसीलदार साहेब यांची रक्तदान करण्याची ३५ वी वेळ होती हे विशेष. त्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांना ०१.०० ते ०२.०० या वेळेत चे लसीकरण करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये अध्यक्षीय भाषण उपकार्यकारी अभियंता श्री वक्ते साहेब यांनी केले व अधीक्षक अभियंता बुलडाणा श्री कटके साहेब, कार्यकारी अभियंता बुलडाणा श्री चव्हाण साहेब, श्री बांबल साहेब बुलडाणा, श्री कदम साहेब बुलडाणा, श्री पंधारे साहेब बुलडाणा,यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांना चे वाटप करण्यात आले. त्यामध्ये विशेष योगदान चिखली चे नामांकित कंत्राटदार श्री रमेश खेडेकर, श्री गजानन जाधव,श्री अमोल गायकवाड व सेंटर चे सर्व सहाय्यक अभियंता श्री बाविस्कर, श्री सवडतकर, श्री गायकवाड, श्री खाडे, श्री जाधव, श्री पडघान, श्री शर्मा यांनी दिले. त्यानंतर कर्मचार्यांचे मनोरंजन होण्यासाठी ऑर्केस्ट्रा चे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. अशा पद्धतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून लाईनमन दिवस साजरा करण्यात आला.हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी श्री गणेश शिराळे, श्री दिपक सावळे, श्री गणेश सोनुने, श्री राम वानखेडे, श्री प्रशांत रिंढे, श्री नंदू लहाने ई. कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# तहसीलदार पिलारेंच्या बदलीसाठी तिसऱ्या दिवशीही उपोषण सुरुच...

जनसंचलन/मोताळा

तहसीलदारांच्या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहे. नागरिकांच्या कामांचा खोळंबा झाला आहे.त्यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करून त्यांची मोताळा येथुन बदली करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते संतोष मेढे यांनी तहसील कार्यालयासमोर ४ मार्च रोजी सुरू केलेल्या उपोषणाची दखल न घेण्यात आल्याने ते बुधवारी तिसऱ्या दिवशीही सुरूच होते.अमरावती विभागीय आयुक्तांना दिलेल्या निव-ेदनात संतोष मेढे यांनी आरोप केला आहे की,तहसीलदार हे आठवड्यातून तीनचार दिवस कार्यालयात येतात.




दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ते मोबाईलवर बोलत असल्याने नागरिक,कार्यालयीन कर्मचारी ताटकळत उभे असतात.त्यांची उद्धटपणाची भाषा असून ते मगरूरपणे वागत आहेत. ते पैसे घेतल्याशिवाय कामच करत नाही.पाच हजारांच्या कामासाठी ते २५ हजार रूपये मागतात.पैसे नाही दिले तर ते प्रकरणात त्रुटी काढत असल्याने सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाल्याचे निवेदणात म्हटले असून त्यांच्या मनमानी कारभाराची सखोल चौकशी करून त्यांची तात्काळ बदली करण्याच्या मागणीसाठी मेढे यांनी उपो-षण सुरू केले असून ते बुधवार ६ मार्च रोजी तिसऱ्या दिवशीही सुरूच होते..

# एक ते दीड लाखात साधं घरकुलही होईना,पण किन्होळा येथील सरपंचांनी केली घरकुलासाठी त्या महिलेला २५००० हजार रुपयाची मागणी...

## जिल्हाधिकारी यांच्याकडे महिलेने केली तक्रार...

जनसंचलन / चिखली



जिल्ह्यातील चिखली तालुका क्यातील किन्होळा गाव हे एक चिखली तालुक्यातील एक आदर्श गाव म्हणून ओळख आहे, गावातील बाहेकर परिवारातील वरिष्ठ नेत्यांनी इतर सर्व समाजाला मान सन्मानाने वागणूक देऊन त्यांना मोठे केले त्यातच एक उदाहरण म्हणून विद्यमान सरपंच अर्चना वसंत जाधव व सरपंच पती वसंत नामदेव जाधव, यांना यापूर्वी विविध पदे दिली व आज रोजी विद्यमान सरपंच म्हणून आरक्षण पदावरून त्यांना विराजमान केले आहे व रोजगार सेवक पद हे सुद्धा त्यांच्याकडे असून बरा-चसा इतर मानसन्मान बाहेकर परिवाराने त्यांना दिला, आहे पण दुःख या गोष्टीचे आहे की , प्रधानमंत्री आवास या योजनेमार्फत घरकुल मंजूर झाले असून, या घरकुलासाठी चक्क सरपंच व सरपंच पती यांनी २५ हजार रुपयाची लाच मागणी केलेली आहे अशी अर्चना बाहेकर यांनी सांगितले असून या गोष्टीचे माझ्याकडे व्हिडिओ क्लिप ऑडिओ क्लिप सुद्धा आहे पण गावच्या वरिष्ठ नेत्यांनी हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करत आहे. २५००० रूपयांची लाच पण अशा महिलेला मागितली त्यांचे पती स्व. लक्ष्मण सुरेश बाहेकर रोजगार सेवक होते त्यांच्या निधनानंतर वसंता जाधव यांना रोजगार सेवक पद मिळाले पण ते त्या पदाचा गैरवापर करीत आहेत. दिनांक ४/३/२४ सोमवार रोजी मी ग्रामपंचायत मध्ये गेली असता सरपंच व सरपंच पती रोजगार सेवक गैरहजर होते, मी माननीय ग्रामसेवक यांच्या हस्ते निरोप दिला असता सरपंच व रोजगार सेवक प्रतिउत्तर द्यायला आले नाही. कॉल केले असता तुम्हाला काय करायचं करून घ्या असं रोजगार सेवक वसंता जाधव बोलले. मी एक विधवा महिला असून, आज माझ्यावर अन्याय होत आहे, उद्या इतरही किन्होळा गावातील गोर-गरीबांवर हा अन्याय होईल, याकडे प्रशासन यांनी लक्ष दयावे अशी मागिनी अर्चना बाहेकर यांनी प्रशासनाकडे केलेली आहे मात्र यामध्ये राजकीय पुढारी तर हस्त-क्षेप करतच आहे पण प्रशास-नाने तरी योग्य कारवाई करून मला योग्य न्याय मिळवून द्यावा लवकरात लवकर कारवाई करावी अन्यथा अमरण उपोषण करू अशी मागणी अर्चना बाहेकर यांनी केली.

# दोन दुचाकींची समोरासमोर धडक; अपघातात दोघे ठार

जनसंचलन / सिंदखेडराजा




दोन दुचाकीची समोरासमोर धडक झाल्याने दोन जण ठार झाले. ही घटना ५ मार्च रोजी रात्री जालना जिल्ह्या-तील टेंभुर्णी येथे घडली. सिंदेखडराजा तालुक्यातील आंचली येथील सरपंच पतीचा मृतकामध्ये समावेश आहे. अंचली येथील सरपंच पती चरणसिंग राजपूत (लखवाळ ४२) हे आ-पले सहकारी मित्र संतोष ब्रम्हणावत यांचे सोबत एका कार्यक्रमासाठी टेंभुर्णी परिसरात गेले होते. मंगळवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास ते मोटारसायकलने घरी परतत असताना टेंभुर्णी गावातील मुख्य रस्त्यावर त्यांच्या मोटारसायकलवर समोरून येणारी अन्य एक मोटारसायकल आदळली. हा अप-घात इतका भीषण होता की, चरण-सिंग राजपूत प्रवास करीत असलेल्या मोटारसायकलने पेट घेतला. यात चरणसिंग व त्यांचे सहकारी संतोष ब्रम्हणवत हे दोघे भाजले गेले तर भतोडी, जाफराबाद येथील अंकुश रमेश शेळके हे शंभर फूट लांब फेकले गेले. या अपघातात चरणसिंग राजपूत व अंकुश शेळके हे दोघे जागीच ठार झाले. तर संतोष ब्राम्हणांवर व शरद उगले हे दोघे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात नोंद घेण्यात आली आहे. दरम्यान बुधवारी सकाळी अंचली येथे चरणसिंग राजपूत यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# संदीप शेळकेंची वाढती लोकप्रियता प्रस्थापीतांसाठी अडचणीची!...

## वन बुलढाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा ठरत आहे सुपरहिट



**जनसंचलन/ बुलडाणा**

आरोप- प्रत्यारोपांच्या भानगडीत पडण्याऐवजी वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके विकासाच्या मुद्द्याचे बोलत आहेत. त्यामुळे त्यांची लोकप्रियता झपाट्याने वाढत असल्याचे चित्र आहे. संदीप शेळकेंची ही वाढती लोकप्रियता आगामी लोकसभा निवडणुकीत प्रस्थापित पुढाऱ्यांना चांगलीच अडचणीची ठरण्याची चिन्हे दिसत आहेत. लोकसभा निवडणुका आता अगदी तोंडावर आल्यात. कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागू होऊ शकते. एप्रिलच्या मध्यापर्यंत कदाचित मतदान झालेले असू शकते. त्यामुळे आता संभाव्य उमेदवार तयारीला लागलेत. बुलडाणा लोकसभा मतदारसंघात यावेळी परिवर्तनाची चाहूल लागलेली दिसत आहे. कुठलेही राजकीय लेबल लागलेले नसतांना देखील राजर्षी शाहू मल्टीस्टेटचे संस्थापक तथा वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी निवडणूकपूर्व तयारीत दमदार आघाडी घेतल्याचे विरोधक देखील मान्य करीत आहेत. अलीकडच्या ५ -६ महिन्यांत त्यांनी संपूर्ण लोकसभा मतदारसंघ पिंजून काढला. संवाद यात्रा काढत जिल्हाभरात ठिकठिकाणी सभा घेतल्या. १० फेब्रुवारीपासून मोताळा तालुक्यातील नळकुंड येथून सुरू केलेली परिवर्तन रथयात्रा तर जिल्ह्यात अक्षरशः सुपरहिट ठरली आहे. राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरण्याआधीच संदीप शेळके यांचा सहकार क्षेत्रातील वावर मोठा होताच. राजर्षी शाहू परिवार, धनिक मायक्रोफायनान्स यासह विविध संस्थांच्या माध्यमातून ते घराघरात पोहचलेले होतेच. हाती सत्ता नसली तरी आपल्याकडे काय नाही यापेक्षा जे आहे त्यातून जे जे चांगले करता येईल याचा प्रयत्न त्यांनी केला. ४० हजार महिलांना कर्जपुरवठा करून महिलांना स्वावलंबी करण्याचे काम त्यांनी केले. याशिवाय सुशिक्षित बेरोजगार आणि विविध कौशल्य अंगी असलेल्या तरुणांना देखील रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी त्यांची धडपड देखील जिल्ह्याने पाहिली आहे. जिल्हापातळीवरील कुठल्या राजकीय नेत्याला हाती सत्ता असताना जे जमले नाही ते सहकार आणि लोकसहभागातून संदीप शेळके यांनी करून दाखवले. आता याचा परिणाम व्हायचा तोच होतोय. संदीप शेळके यांची लोकप्रियता बुलडाणा लोकसभा मतदारसंघात झपाट्याने वाढत आहे. खरं तर सध्याच्या राजकारणात सोबतीला राजकीय पक्ष असल्याशिवाय काही खरे नाही अशी मानसिकता. मात्र संदीप शेळके त्याला अपवाद ठरले आहेत. आतापर्यंत राजकीय पक्षांनी जाहीरनामा प्रसिद्ध करणे पाहण्यात आले मात्र संदीप शेळके यांनी ‍‍जनतेचा जाहीरनामा‍‍ ही अनोखी संकल्पना मांडली. बुलडाणा जिल्ह्याचा विकास हा एकमेव अजेंडा ठरवून वन बुलडाणा मिशन ही राजकीय लोकचळवळ उभी केली. बुलडाणा जिल्ह्याचे मागासलेपण दुर करण्यासाठी काय काय करता येईल यावर स्वतःचेच टूमने न वाजवता जनतेच्या सुचना मागवल्या. सिने अभिनेते भरत गणेशपुरे यांनी संदीप शेळकेंची मुलखात देखील जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली. आरोप प्रत्यारोप न करता, एकमेकांची उणी - दुणी न काढता देखील विकासाचा मुद्दा प्रकर्षाने समोर आणता येऊ शकते हे संदीप शेळकेंनी दाखवून दिले. बुलडाणा जिल्ह्याचा इतिहास गौरवशाली आहे. जगाला हेवा वाटावा असा भौगोलिक वारसा आहे. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेली धार्मिक स्थळे जिल्ह्यात आहेत. तरीही जिल्ह्याची ओळख मागासलेला जिल्हा का? असा संदीप शेळकेंचा सवाल योग्यच आहे आणि लोकांना देखील तो पटल्याचे दिसत आहे. जिल्ह्यात संत्रा प्रकिया उद्योग, केळी प्रक्रिया उद्योग, महिलांसाठी कॉमन फॅसिलिटी सेंटर अशा अनेक मुद्द्याच्या गोष्टी संदीप शेळके करीत आहेत, त्यामुळे रिकामी भाषणबाजी करण्यापेक्षा मुद्द्याच बोलणाऱ्या संदीप शेळकेंची लोकप्रियता वाढत आहे. पारंपारिक राजकारणापेक्षा राजकारणाची नवी पद्धत संदीप शेळकेंनी जिल्ह्यात सुरू केली आहे. सध्या ते कुठल्याही राजकीय पक्षात नसले तरी लोकसभा निवडणुकीचे सूक्ष्म नियोजन त्यांनी केले आहे. १२०० पेक्षा अधिक गावात बूथ बांधणीचे काम देखील त्यांनी पूर्ण केले आहे. त्यामुळे एवढी तयारी असलेल्या संदीप शेळकेंवर राजकीय पक्षांच्याही नजरा आहेत. पुढे काय चित्र असेल हे सध्या अस्पष्ट असले तरी अपक्ष उमेदवार म्हणून देखील संदीप शेळके यांनी प्रस्थापित राजकीय नेत्यांसमोर चांगलेच मोठे आव्हान निर्माण केले आहे. १० फेब्रुवारीपासून शेळके यांनी जिल्ह्यात परिवर्तन रथयात्रा सुरू केली. मोताळा, शेगाव, संग्रामपूर, खामगाव या ४ तालुक्यात परिवर्तन रथयात्रेने आतापर्यंतचा प्रवास केला आहे. या चारही तालुक्यात या यात्रेला जबरदस्त प्रतिसाद मिळाला. गावागावांत झालेल्या सभामधून संदीप शेळके यांनी जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन लोकांसमोर मांडले. या यात्रेदरम्यान संदीप शेळके यांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या देखील भेटी घेत आहेत. तरुण, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, शेतमजूर, नोकरदार वर्ग या सर्वच मतदारांचा संदीप शेळके यांना मोठा पाठिंबा मिळाल्याचे परिवर्तन रथयात्रेच्या दमदार यशावरून दिसत आहे.

# बुलढाण्यातील ऐतिहासिक धम्म परिषदेची जय्यत तयारी

## धम्मबांधवांची अहोरात्र मेहनत : विशाल मंडपाची उभारणी

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील बौद्धबांधवांना एक नवी दिशा देणारी आणि ऐतिहासिक, अभूतपूर्व अशी जागतिक धम्म परिषद बुलढाणा येथे ९ मार्च रोजी पार पडत आहे. या परिषदेची जय्यत तयारी सुरू असून, ही परिषद न भूतो न भविष्यती अशी करण्यासाठी जिल्हाभरातील धम्मबांधव अहोरात्र मेहनत घेताना दिसत आहेत. मूकनायक फाऊंडेशन व वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांच्या पुढाकारातून, संयोजनातून आणि मार्गदर्शनाखाली धम्म परिषदेचे बारकाईने नियोजन करण्यात आले आहे. बुलढाणा येथील शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर ९ मार्चला होणाऱ्या जागतिक धम्म परिषदेसाठी विशाल मंडप उभारण्यात आला आहे. या परिषदेत सहभागी होणाऱ्या धम्मबांधवांसाठी विविध सोयी, सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत. सकाळी साडेआठ वाजता उद्घाटन झाल्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत परिषदेतील विविध कार्यक्रम पार पडतील. उद्घाटन सोहळ्याला जिल्हाधिकारी



डॉ. किरण पाटील, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने, समाज कल्याण सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सकाळी ११ वाजता धम्म परिषदेत बंदरे व गृह मंत्रालयाचे सहसचिव सिद्धार्थ खरात, पुणे उपजिल्हाधिकारी सिद्धार्थ भंडारे, ज्येष्ठ साहित्यिक नारायणराव जाधव येळगावकर, डॉ. पंजाब हिरे, असिस्टंट कमांडट मोनिका साळवे, उद्योजक डॉ. अर्चित हिरोळे यांना मूकनायक बुलढाणा हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. बौद्ध धम्मगुरुंची विशेष उपस्थिती जागतिक कीर्तीचे बौद्ध धम्मगुरु भन्ते ज्ञानज्योती महाथेरो यांचे धम्म प्रवचन होणार आहे. त्याचप्रमाणे भन्ते ज्ञानरक्षित थेरो (संभाजीनगर) आणि श्रीलंकेहून भन्ते शांतचित्त थेरो, भन्ते यश, भन्ते गुणानंद व भन्ते पुन्न यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. हे भन्ते धम्मदेसना देणार आहेत. भारतात बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन आणि बळकटीकरण, युवकांसाठी बौद्ध धर्मावरील विशेष सत्र, ध्यान साधना, धम्माची शिकवणूक, महापरित्राणपाठ, पुण्यानुमोदन असे सत्र पार पडतील. विविध महत्त्वपूर्ण ठराव करणार संमत बुद्धांनी दिलेल्या धम्मानुसार धम्मबांधवांसाठी काही महत्त्वपूर्ण ठराव या परिषदेत घेतले जाणार आहेत. बौद्ध धर्मात सामाजिकदृष्ट्या हे ठराव एक चांगली शिकवण देण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

# मतमोजणीच्या ठिकाणी काटेकोर नियोजन करावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन / खामगाव**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतमोजणीच्या ठिकाणी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, यासाठी आतापासूनच काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. लोकसभा निवडणुकीची मतमोजणी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होणार आहे. त्यानुषंगाने आज जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी मतमोजणीची व्यवस्था, स्ट्राँगरूम आदी परिसराची पाहणी केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, उपजिल्हाधिकारी शरद पाटील, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मतमोजणी होणाऱ्या परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी याठिकाणी मतमोजणी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. मतमोजणीच्या ठिकाणी मतदान प्रतिनिधी, मतमोजणी करणारे कर्मचारी तसेच मतमोजणीच्या ठिकाणी असणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी आसन व्यवस्था, तसेच अनुषंगिक बाबीची माहिती घेतली. मतदानानंतर ईव्हीएम औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील स्ट्राँग रूम मध्ये ठेवण्यात येणार आहे. याठिकाणी असणारी व्यवस्था, सुरक्षितता याबाबत आढावा यावेळी घेण्यात आला. मतदान यंत्र ठेवलेल्या परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात यावी. मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या ठिकाणी पुरेशी विजेची व्यवस्था करण्यात यावी. या परिसराची सुरक्षा केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडे सोपविण्यात आली. त्यांच्या दृष्टीकोनातून आवश्यक असणाऱ्या सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मतमोजणीच्या ठिकाणी मतदान प्रतिनिधी आणि कर्मचारी वर्ग असणार आहे. त्यांच्यासाठी पाणी, स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी. निवडणुकीचा निकाल जाणून घेण्यासाठी नागरिक मतमोजणीच्या ठिकाणी येतात. त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी. नागरिकांना निकाल माहिती व्हावा, यासाठी उद्घोषणेची व्यवस्था करण्यात यावी. तसेच कर्मचारी आणि नागरिकांसाठी वाहनतळाची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचनाही डॉ. पाटील यांनी दिल्या.

# आमचा नाही कोणी वाली म्हणून घेतलाय निर्णय...

## पांढरी खानापूर येथील बौद्ध समाजातील २०० कुटुंब आज गाव सोडून मंत्रालय मुंबईच्या दिशेने....







वृत्तसंस्था/ अमरावती

महाराष्ट्र अमरावती जिल्हातील अंजनगाव सुर्जी येथील पांढरी खानापूर मधील बौद्ध समाज गावाच्या स्वागत कमानीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नाव देण्याला जातीयवादी केल्याने विरोधात व बौद्ध समाजावर बहिष्कार टाकण्यात आल्याने दोनशे कुटुंबीयांनी गाव सोडण्याचा निर्णय घेतला असून आज पासून पांढरी खानमपूर ते मुंबई मंत्रालय असा पायी लाँगमार्च काढण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नाव असलेले प्रवेशद्वार बांधकाम करण्याचे नाहरकत प्रमाणपत्र शासनाकडून आले आहे. जातीयवादी लोकांनी गावातील बौध्द समाजावर सामूहिक जातीय बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे बौध्द बांधवांनी गाव सोडण्याचा निर्णय घेतला असून आज बौद्ध समाज बांधव सकाळी १० वाजता गाव पांढरी खानमपूर सोडले असून. पांढरी येथून- अंजनगावसुर्जी, दर्यापूर, भातकुली, अमरावती येथे पोहोचतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पुतळ्याला अभिवादन करून विभागीय आयुक्तांना पुन्हा निवेदन देऊन परत अकोला व बुलडाणा जिल्ह्यातून शे-गाव, खामगाव, चिखली, जालना, औरंगाबाद मार्गे मुंबईत थेट मंत्रालय येथे पोहोचून ठिय्या आंदोलन करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. पांढरी खानमपूर येथील आंबेडकरी समाजातील सुमारे २०० कुटुंब गाव सोडून मुंबईकडे कुच करणार आहेत. निळ्या ध्वजांसह महिला देखील मोठ्या संख्येने लाँगमार्चमध्ये सहभागी झालं आहेत. गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाच्या प्रवेशद्वाराला विरा-ध करणारे व बौद्ध समाजावर जातीय बहिष्कार करणाऱ्यांच्या विरोधात बौद्ध समाज आता मंत्रालय मुंबईच्या दिशेने पायी रवाना झालेत

## घाटपुरी येथील युवकाची नांदुऱ्यात केली हत्या...

जनसंचलन /नांदुरा

नांदुरा शहरापासून नजीकच असलेल्या मोताळा रोडवरील एका पेट्रोलपंपानजीक २ मार्च रोजी मृतावस्थेत आढळून आलेल्या युवकाची ओळख पटली आहे. तो घाटपुरी येथील हर्षल उर्फ पप्पू सदाशिव घोपे असल्याचे निष्पन्न झाले असून, या प्रकरणातील आर-ोपी अद्याप फरार असल्याचे समजते. प्राप्त माहितीनुसार, मोताळा रोडवरील माउली पेट्रोल पंपाजवळील लोणवाडी शेतशिवारातील शेताच्या धुऱ्यावर एक युवक मृतावस्थेत दोन मार्च रोजी आढळून आला. मृतकाचा चेहरा विद्रुप तसेच त्याच्या डोक्यावर मारल्याचे व्रण आढळले होते. गळा आवळून खून झाल्याचेही प्रथमदर्शनी समोर आले होते. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, नांदुरा पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला. युवकाचे छायाचित्र प्रसिद्धी तसेच समाज माध्यमात प्रसिद्ध केले. माहिती समजल्यानंतर मृतकाचा भाऊ अभिषेक घोपे याने सोमवार ४ मार्च रोजी रात्री नांदुरा पोलिस




स्टेशनमध्ये मृतक युवक हा आपला भाऊ असल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यावरून पोलिसांनी हर्षल उर्फ पप्पू सदाशिव घोपे याचा मृतदेह त्यांच्या ताब्यात दिला. युवकाच्या हत्येचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. याप्रकरणी नांदुरा पोलिस करून चौकशी करीत आहेत.

## अधिकाऱ्याला मारहाण; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

जनसंचलन / सिंदखेडराजा


सिंदखेडराजा येथील तहसील कार्यालयातील प्रभारी नायब तह-सीलदार गणेश नागरे यांना कार्यालयात असताना मारहाण झाल्याची घटना बुधवारी दुपारी घडली. याप्रकरणी ना-गरे यांच्या तक्रारीवरून एकाविरोधात शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी सिंदखेडराजा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गणेश नागरे हे बुधवारी दुपारी आपल्या कामात असताना हिवरा गडलिंग येथील ज्ञानेश्वर खरात यांनी कार्यालयात येऊन नागरे यांच्याशी आपले काम होत नसल्याबद्दल हुज्जत घालत त्यांना कार्यालयातच मारहाण केली. दरम्यान, अन्य कर्मचाऱ्यांना हा प्रकार कळताच तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी एकत्र येत मारहाण करणाऱ्या खरात यांना तत्काळ अटक करण्याची मागणी केली. सोबतच कामबंद आंदोलनही पुकारले होते.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

## अल्पवयीन मुलीचे करण्यात आले लैंगिक शोषण...

जनसंचलन / संग्रामपूर

गत तीन वर्षांपासून अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण करून मारहाण करण्याचा धक्कादायक प्रकार तालुक्यात उघडकीस आला. याप्रकरणी मंगळवारी रात्री सोनाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संग्रामपूर तालुक्यातील एका गावात सन २०२१ पासून अजय संतोष लोणकर याने १७ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत अनैतिक संबंध ठेवले. मोबाइलमध्ये असलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीने १७ फेब्रुवारीला अल्पवयीन मुलीवर शेगाव येथील एका गेस्ट हाऊसवर अत्याचार केला. तसेच मुलगी खामगाव येथील कॉलेज समोर आरोपीने तिला मारहाण करत जिवाने मारण्याची धमकी दिली. ५ मार्चला रात्री उशिरा अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून सोनाळा पोलिस ठाण्यात आरोपी अजय संतोष



लोणकर विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मलकापूर उपविभागीय पोलिस अधिकारी डी. एस. गवळी करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958